राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क) यांचे कार्यालय,
ई-विंग, पहिला मजला, वस्तू व सेवा कर भवन,
माझगांव, मुंबई -४०० ०१०.
दूरध्वनी क्र. ०२२-२३७६०९९९, ००३.
Email id: - *prosalestax@gmail.com*

**क्र. राउआ (जनसंपर्क)/ दरपत्रक/ महाविकास/ 2025-26/ ब-** 513 **मुंबई दि.** 16/04/2026

प्रति,

मा. राज्यकर सहआयुक्त (महाविकास),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय : वस्तू व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई येथील भंगार व निरुपयोगी साहित्य विक्रीची दरपत्रक सूचना विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत.**

**संदर्भ :1) राउआ(जनसंपर्क)/ स्क्रॅप/ 2025-26/ ब- 1725 मुंबई दि. 17/12/2025.**
**2) राउआ (जनसंपर्क)/ भंगार साहित्य निर्लेखन/ 2025-26/ ब- 512 मुंबई दि. 16/04/2026.**

महोदय,

वस्तू व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई येथील कार्यालय परिसरात साठविण्यात आलेल्या निरुपयोगी व भंगार साहित्याची "जेथे आहे तसे आहे" या तत्त्वावर विक्री करण्याबाबत दरपत्रक सूचना तयार करण्यात आलेली आहे.

सदर दरपत्रक सूचना इच्छुक भंगार व्यापारी / ठेकेदार यांच्याकडून मोहरबंद दरपत्रके मागविण्यासाठी प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यानुसार सदरची दरपत्रक सूचना विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्यामुळे सोबत जोडलेली जुने भंगार साहित्य विक्रीची दरपत्रक सूचना विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

**( मा. राज्यकर सहआयुक्त (अन्वेषण-ब) (भा.प्र.से.) यांच्या मान्यतेने )**

संतोषकुमार प. राजपुत
राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क)

**सोबत :** भंगार व निरुपयोगी साहित्याची दरपत्रक सुचना ( प्रपत्र १) सहीत.

H Pabl
Bhoi [illegible]
17/4/26

राज्यकर सहआयुक्त (महाविकास)
महाराष्ट्र राज्य, मुंबई
17 APR 2026
आवक क्र. 701
वि.नि./ लिपीक

राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क) यांचे कार्यालय,
ई-विंग, पहिला मजला, वस्तू व सेवा कर भवन,
माझगांव, मुंबई -४०० ०१०.
दूरध्वनी क्र. ०२२-२३७६०९९९, ००३.
Email id: - prosalestax@gmail.com

क्र. राउआ (जनसंपर्क)/ भंगार साहित्य निर्लेखन/ 2025-26/ ब-512 मुंबई दि. 16/04/2026

## जुने भंगार साहित्य विक्रीची दरपत्रक सूचना

वस्तु व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई येथील सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे निरुपयोगी व भंगार साहित्याची **"जेथे आहे जसे आहे"** या तत्त्वावर विक्री करावयाची असल्याने सदर साहित्य खरेदी करणा-या इच्छुक भंगार व्यापारी/ ठेकेदार यांच्याकडुन मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची लखोटा बंद दरपत्रके राज्यकर उपायुक्त, जनसंपर्क व सुरक्षा, वस्तु व सेवा कर भवन पहिला मजला, नवीन इमारत, ई विंग, माझगाव मुंबई या कार्यालयात **दिनांक 24/04/2026 रोजी 6.15 P.M. वाजेपर्यंत** पोहचतील अशा बेताने सादर करावीत.

❖ दरपत्रक सादर करण्याच्या सर्वसाधारण अटी.

१. दरपत्रकासोबत एजन्सीने देयकाची हमी म्हणून रुपये २०००/- इतकी अनामत रक्कम **ESTABLISHMENT OFFICER PUBLIC RELATION AND SECURITY OFFICE** नावे रोख किंवा डी.डी. च्या स्वरूपात जनसंपर्क व सुरक्षा कार्यालय, माझगाव, मुंबई भरावी. रोख स्वरूपात रक्कम जमा केली असल्यास दरपत्रकासोबत रोख रक्कम भरल्याची पावती सादर करावी.
२. दरपत्रकासोबत कंपनीचे / **proprietary firm** / मालकाचे पॅन कार्ड आवश्यक आहे.
३. आपली दरपत्रके/देकार स्वतःच्या लेटर हेडवर सोबत जोडलेल्या **प्रपत्र १** मध्ये भरून सादर करावी.
४. ज्या एजन्सीचे दरपत्रक मंजूर होईल, त्यांनी साहित्याची पूर्ण रक्कम भरल्यानंतर वरील अट क्र.१ प्रमाणे जमा अनामत रक्कम त्या एजन्सीस परत करण्यात येईल.
५. दरपत्रके सादर करण्यापूर्वी सदरचे साहित्य इच्छुक दरपत्रक धारकांनी साहित्य ज्या ठिकाणी पडून आहे. त्या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पाहण्यास मिळेल. दरपत्रक सादर केल्यानंतर कोणत्याही निविदाकाराची तक्रार/हरकतीची दखल घेतली जाणार नाही.
६. साहित्याची यादी व साहित्य ज्या ठिकाणी **"जेथे आहे जसे आहे"** त्याचा तपशील सोबत जोडला आहे.
७. दरपत्रकामध्ये निविदाकाराने आपला **देकार अक्षरी व अंकाने** लिहिलेला असावा.
८. कोणतीही अट असलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.
९. लखोटा बंद दरपत्रके राज्यकर उपायुक्त, जनसंपर्क व सुरक्षा, वस्तु व सेवा कर भवन पहिला मजला, नवीन इमारत, ई विंग, माझगाव मुंबई यांचे नाव व आस्थापना अधिकारी, जनसंपर्क व सुरक्षा यांचे कक्षामध्ये **दिनांक 24/04/2026 रोजी 6.15 P.M. वाजेपर्यंत** सादर करावीत व दरपत्रके सादर केल्याची पोहच घ्यावी.
१०. प्राप्त झालेल्या दरपत्रके **दिनांक 27/04/2026 रोजी सकाळी 11:00 वाजता** दरपत्रक सादर करणाऱ्या किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींच्या समोर उघडण्यात येतील. जर काही कारणास्तव शक्य नसल्यास दरपत्रके उघडण्याचा दिनांक स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल.

११. इच्छुक खरेदीदाराने **जास्तीत जास्त रकमेचा** दरपत्रक सादर करावा.

१२. ज्या एजन्सीच्या नावाने दरपत्रक मंजूर होईल त्यांनी मंजूर दरपत्रकाची रक्कम एकरकमी मंजुरी आदेश मिळाल्यापासून १० दिवसांच्या आत डी.डी. स्वरूपात जमा करणे बंधनकारक राहील. अन्यथा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१३. मंजूर एजन्सीने भंगाराची रक्कम भरणा केल्यापासून १० दिवसांच्या आत भंगार साहित्य कार्यालयीन जागेतून उचलणे बंधनकारक राहील अन्यथा सदर भंगार साहित्याची जबाबदारी प्राधिकरणाची राहणार नाही. तसेच १० दिवसांनंतर होणाऱ्या विलंबास रुपये ५००/- प्रति दिवस दंड आकारण्यात येईल.

१४. सदरचे साहित्य एकत्रित करून ठेवले असल्याने एजन्सीने सदर निरुपयोगी व भंगार साहित्याकरिता दरपत्रकामध्ये सादर करण्यात येणारा देकार हा एकरकमी एकत्रित देकार सर्व करासहित भरलेला असावा. उदा. सदर व्यवहारावर कोणत्याही स्वरुपाचा कर/ फि भरावी लागल्यास तो एजन्सीने स्वतः भरावयाचा आहे.

१५. वर निर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर सादर होणारे दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.

१६. भंगार साहित्य उचलताना त्यावरील लोडिंग/ अनलोडिंग/ वाहतूक/ कर हा सर्व खर्च साहित्य घेणाऱ्या एजन्सीने स्वतः करावयाचा आहे.

१८. दरपत्रकातील देकार लिहिताना प्रत्येक दुरुस्तीच्या ठिकाणी एजन्सीने आपल्या सहीचे आद्याक्षर व मोहर उमटवावी. देकारातील अंकामध्ये काही दुरुस्ती असल्यास अक्षरांमध्ये लिहिलेला देकार अंतिम समजण्यात येईल.

१९. ज्या एजन्सीचे दर मंजूर होतील त्यांनी स्वतःचे भंगार साहित्य **"जैसे आहे तसे आहे"** या तत्वावर उचलावे.

२०. कोणतीही एक निविदा स्वीकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे.

संतोषकुमार प. राजपुत
राज्यकर उपायुक्त (जनसंपर्क)

**सोबत :** भंगार व निरुपयोगी साहित्याची प्राथमिक यादी दरपत्रकासहीत ( प्रपत्र १)

**प्रत:**

11) कार्यालय नोटीस बोर्ड

12) मा. राज्यकर सहआयुक्त महाविकास, विभागाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी.

# प्रपत्र १

## निरुपयोगी व भंगार साहित्य खरेदी करण्यासाठीचे दरपत्रक

| अ.क्र. | संख्या (नग) | साहित्याचा तपशील | साहित्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | १७० नग | रिव्हाल्वींग लोखंडी खुर्ची | वस्तु व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई |
| २ | २ नग | लोखंडी कपाट (लहान/मोठी) | |
| ३ | २ नग | लाकडी कपाट (लहान/मोठी) | |
| ४ | १ नग | लोखंडी टेबल | |
| ५ | २ नग | लाकडी टेबल | |
| ६ | १०० नग | लोखंडी खुर्ची | |
| ७ | ४० नग | लाकडी खुर्ची | |
| ८ | ९ नग | सोफ़ा | |
| ९ | १४ नग | लोखंडी रॅक (लहान/मोठी) | |
| १० | ३० नग | साधी खुर्ची | |

**दरपत्रक सूचनेतील सर्व अटी मला/आम्हाला मान्य असून वरील निकषांप्रमाणे भंगार साहित्य मी/आम्ही स्वत: पाहिले असून माझे/आमचे समाधान झाले आहे. वरील साहित्य खरेदी करीताना मी/आम्ही सर्व करांसहित (GST सह) एक रकमी रुपये ---------------------- अक्षरी रुपये (-------------- --------------------) मुदतीत भरणा करण्यास तयार आहे/आहोत. सदर व्यवहारावर GST भरावी लागल्यास ती मी/आम्ही स्वत: शासनास भरण्यास आमच्यावर बंधनकारक आहे.**

**ठेकेदार/खरेदीदार/एजन्सीचे नाव सही व शिक्का**

**ठिकाण:**

**दिनांक:**

**कार्यालयीन वेळेत भंगार साहित्य पाहण्यासाठी संपर्क:**
**आशिष पवार (राज्यकर निरीक्षक)**
**मो. न. ( 8983776624 )**